

## — सावली —

का सारखी पायात घोटाळशी
ये ग ये सरके जरा हृदयाशी
साथ जन्माची तुझी नी माझी
जवळी न येशी कधीही जराशी

भ्रमलीस वणवण माझ्या सवे
मूक सोबत, गृहीत मी धरले
दुर्लक्षिले अक्षम्य आजवर तुला
जपलेस तू सावली होऊन मला

मीपण नव्हे ग, द्वैत हे अपुले
एकली न मी, मज भान आले
कधी समोरी कधी पाठीसारखी
कधी पायतळी कधी कुशी होशी

जन्मभराची मम तू संगाती
हितगुज न झाले तू अशी विरागी
सरणावरी जाऊ दोघी विरूनी
नको, नको तो नवजन्म फिरूनी.

माणिक कोलगुड
E-1, मधुराजनगर पौड रोड
पुणे

**व्हिडिओ पहा**